| CNR No.MHPU130010432024 | रे.दि.मु.नं. १७३/२०२४<br>जगन्नाथ<br>वि.<br>प्रभाकर |
| --- | --- |

## निशाणी क्र. १५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कैफियत व अंतरिम अर्जावर म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. सदर प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, ते सदर प्रकरणात हजर झाले होते. तथापि,त्यांच्यातर्फे विधिज्ञ यांनी ई– फायलिंग सी.आय.एस प्रणालीवर वादी यांनी दाखल केलेले वादपत्र, कागदपत्रे, अंतरिम अर्ज व इतर कथने पाहण्याचा प्रयत्न करुन सुद्धा सी.आय.एस.प्रणालीतील तांत्रीक दोषामुळे त्यांना सदर कागदपत्रे पाहता येऊ शकली नाहीत. यामध्ये सदर प्रतिवादींचा काहीही दोष नाही. असे कथन करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांनी निशाणी क्र. १८ येथे त्यांचे म्हणणे देवून आक्षेप घेवून असे कथन केले आहे की, सदर अर्ज खोटा व लबाडीचा आहे. सदर अर्जात नक्की किती विलंब झाला याचे कथन केले नाही. मोघम स्वरुपाचे कथन केले आहे. असे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

४. प्रतिवादी व वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तीवाद केला. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, ते सदर प्रकरणात हजर झाले होते. तथापि,त्यांच्यातर्फे विधिज्ञ यांनी ई– फायलिंग सी.आय.एस प्रणालीवर वादी यांनी दाखल केलेले वादपत्र, कागदपत्रे, अंतरिम अर्ज व इतर कथने पाहण्याचा प्रयत्न करुन सुद्धा सी.आय.एस.प्रणालीतील तांत्रीक दोषामुळे त्यांना सदर कागदपत्रे पाहता येऊ शकली नाहीत. यामध्ये सदर प्रतिवादींचा काहीही दोष नाही. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र दिले आहे. सदर दाव्याचा गुणाणुगुणावर निपटारा होण्यासाठी कैफियत व अंतरिम अर्जावर म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ केल्याने मदतच होणार आहे. प्रतिवादी यांनी ई– फायलिंग सी.आय.एस. प्रणालीतील दोषाबाबत केलेली कथने ग्राह्य धरता येणार नाहीत.

प्रतिवादी उशीराने कैफियत व अंतरिम अर्जावर म्हणणे देत असल्यामुळे वादींना होणा–या त्रासाची भरपाई काही रक्कम देवून करता येईल. अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वरील विवेचनाचा विचार करुन खालील आदेश पारीत करत आहेः–

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांना कैफियत व अंतरिम अर्जावर म्हणणे देण्यास झालेला विलंब रक्कम रु. ५००/– इतकी भरपाई वादींना देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

३. भरपाईची रक्कम दिल्यानंतर कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

RAVINDRA ANANDRAO SAWANT
Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2026.02.21 15:47:41 +0530

दिनांकः २१.०२.२०२६
सासवड.

( रविंद्र आ. सावंत )
२ रे सह दि.न्या. क. स्तर, सासवड.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file orders are same word for word as per original Judgment/order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. R. Shirke (Stenographer Grade III) |
| Court Name | : | Shri. R. A. Sawant<br>C.J.J.D.& J.M.F.C.,Saswad. |
| Date | : | 21/02/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 21/02/2026 |
| Order Uploaded on | : | 21/02/2026 |